16-06-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 6/15/2025 9:24 PM Page 1



कातकऱ्यांना मिळाले वीजेनंतर पाणी

पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



ऑस्ट्रेलियाचा अपराजित प्रवास खंडीत

पान ४ वर

वेर्णा, सोमवार, १६ जून २०२५ | पाने ४ | ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 284 | Verna, | facebook.com/dainikherald | Monday 16 June 2025 | Pages 4 | ₹ 4

## गोव्यात पावसाचा जोर वाढला

### सरासरी हंगामी पावसात ६.७ टक्क्यांनी वाढ | पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा अधिक

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. १५ : राज्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे हंगामी सरासरी पावसाचे प्रमाण आता सामान्याच्या तुलनेत अधिक नोंदवले गेले आहे. भारतीय हवामान विभागाच्या (आयएमडी ) ताज्या आकडेवारीनुसार, १ जून ते १५ जून २०२५ या कालावधीत राज्यात सरासरी १५.९ इंच इतका पाऊस झाला आहे. हे प्रमाण सामान्यतः अपेक्षित असलेल्या १४.२३ इंचांच्या तुलनेत ६.७ टक्क्यांनी अधिक आहे.**



विशेष म्हणजे, केवळ १० जूनपर्यंतच्या अहवालात गोव्यात पावसाची कमतरता जाणवत होती. त्या वेळेस ७ इंच अपेक्षित असताना केवळ ३.७७ इंच पावसाची नोंद झाली होती ही ४६.९ टक्के तूट होती. मात्र, पुढील पाच दिवसांत मुसळधार पावसामुळे ही तूट भरून निघाली आणि आता एकूण पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा अधिक झाले आहे.

हवामान खात्याने पुढील काही दिवसांसाठीही मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. १६ आणि १७ जून रोजी उत्तर आणि दक्षिण गोव्यातील अनेक भागांत मुसळधार ते जोरदार पावसाची शक्यता वर्तवली आहे. यासोबतच, १८ ते २१ जून २०२५ दरम्यानदेखील काही ठिकाणी मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

या कालावधीत वाऱ्याचा वेग ४० ते ५० किमी प्रतितास, काही ठिकाणी ६० किमी प्रतितासपर्यंत जाण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्यामुळे किनारी भागांत आणि उघड्या समुद्रात जाणाऱ्यांनी खबरदारी घेण्याचे आवाहन हवामान खात्याने केले आहे.

गोव्यात १५ जून रोजी सकाळी ८.३० वाजेपर्यंत मागील २४ तासांत सांगे – ५.७ इंच,धारबांदोडा – ४.९ इंच, ओल्ड गोवा– ४.४ इंच, पणजी – ४.२ इंच, फोंडा – ४ इंच,दाबोळी – ३.९३ इंच, मुरगाव – ३.९३ इंच, साखळी– ३.२ इंच,काणकोण – २.८ इंच,पेडणे – २.३ इंच, तर म्हापसा येथे १.४ इंच पाऊस झाला या आकडेवारीतून स्पष्ट होते की राज्यात पावसाची तीव्रता विभागनिहाय वेगवेगळी असून, दक्षिण गोव्याच्या अनेक भागांत अधिक पावसाची नोंद झाली आहे. हंगामी पावसाची ही सुरुवात राज्यातील शेती आणि जलसाठ्यांच्या दृष्टीने निश्चितच दिलासादायक मानली जात आहे. मात्र, काही भागांतील अचानक वाढलेल्या पावसामुळे स्थानिक पूरजन्य परिस्थिती आणि भूस्खलनाचा धोका राहू शकतो, त्यामुळे प्रशासनाने सतर्कतेचे निर्देश जारी केले आहेत. सद्यस्थितीत, हवामान विभाग आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा पूर्णपणे सज्ज असून, संभाव्य धोक्यांना सामोरे जाण्यासाठी तयारी केली जात आहे. नागरिकांना हवामान अपडेट्सकडे लक्ष ठेवण्याचे आणि आवश्यक खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## कोलवा सांडपाणी पंपिंग स्टेशनमध्ये बिघाड 'जैसे थे'



▶ सांडपाणी शेतांमध्ये घुसल्याने मोठ्या प्रमाणात प्रदूषण

टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १५ :** कोलवा येथील मत्स्यव्यवसाय विभागाजवळील सांडपाणी पंपिंग स्टेशनमध्ये गंभीर बिघाड झाल्याने परिसरातील सांडपाणी समस्येने पुन्हा डोके वर काढले आहे. बिघाडामुळे प्रक्रिया न केलेले सांडपाणी गेल्या चार दिवसांपासून थेट जवळील शेतांमध्ये सोडले गेले असल्यामुळे पर्यावरणीय आणि आरोग्याशी संबंधित चिंता निर्माण झाल्या आहेत.

या समस्येची पुष्टी कोलवा ग्रामपंचायत, सांडपाणी विभाग आणि जैवविविधता समितीने संयुक्तपणे केलेल्या तपासणीत झाली आहे. अधिकाऱ्यांनी वीज पुरवठ्यातील अनियमितता, विशेषतः चढ-उतार, या बिघाडाचे मुख्य कारण असल्याचे नमूद केले. विशेष म्हणजे, परिसरातील आणखी दोन पंपिंग स्टेशन अजूनही कार्यान्वित नाहीत, त्यामुळे संपूर्ण सांडपाणी व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. ही समस्या कोलवा समुद्रकिनाऱ्याच्या नजीकच्या परिसरात गेल्या काही वर्षांपासून सातत्याने उद्भवत असून, यामुळे गोव्याच्या पर्यटन प्रतिष्ठेला धक्का बसत आहे. या पार्श्वभूमीवर कोलवा सिविक अँड कंझ्युमर फोरम (सीसीसीएफ) च्या अध्यक्षा ज्युडिथ अल्मेडा यांनी गोवा राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि संबंधित प्रशासकीय यंत्रणांवर तीव्र टीका केली आहे.

सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प सुरू करण्यापूर्वी आवश्यक तांत्रिक तज्ज्ञांची नियुक्तीच करण्यात आली नाही, हे सरकारचे अपयश आहे, असे आल्मेडा यांनी सांगितले.

पान २ ▶

## निवडक

### इस्रायल – इराण संघर्ष पेटणार!

**तेल अवीव, दि. १५ :** इराण आणि इस्रायलमधील संघर्षाची धग आणखी तीव्र होत चालली आहे. दोन्ही देशांकडून एकमेकांवर जोरदार हल्ले केले जात आहेत. शनिवारी रात्री इस्रायलने इराणच्या लष्करी तळांना लक्ष्य केले. प्रत्युत्तरात इराणने पुन्हा एकदा इस्रायलवर मोठ्या प्रमाणात क्षेपणास्त्रे डागली आहेत. यामुळे संघर्ष पेटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. दरम्यान, अमेरिका आणि इराणमधील चर्चा देखील रद्द करण्यात आली आहे. इस्रायलच्या हल्ल्यांनंतर अमेरिकेसोबतच्या अणुचर्चा या निरर्थक असल्याचे इराणने म्हटले आहे.
इराणच्या सरकारी टीव्हीच्या वृत्तानुसार, शहराच्या पूर्व आणि पश्चिम भागात स्फोटांचे आवाज ऐकू येत आहेत. इस्रायली सैन्याने रविवारी पहाटे सांगितले की, हल्ल्यात इराणचे संरक्षण मंत्रालयाचे मुख्यालय आणि एका मोठ्या तेल डेपोला लक्ष्य करण्यात आले.
इस्रायली सैन्याने तेहरानभोवती इराणच्या अणुकार्यक्रमाशी संबंधित ठिकाणांना लक्ष्य केल्याचा दावा केला आहे. इराणने इस्रायलवर आणखी एक क्षेपणास्त्र हल्ला केला आहे. शनिवारी मध्यरात्री इस्रायलच्या सुरक्षा मंत्रिमंडळाची बैठक सुरू असताना हे हल्ले झाले. इराणच्या रिव्होल्यूशनरी गार्डचे म्हणणे आहे की, इराणी क्षेपणास्त्रांनी इस्रायली विमानांसाठी इंधन तयार करणाऱ्या सुविधांना लक्ष्य केले.

---

### मणिपूरमध्ये ३२८ बंदुकांसह मोठा शस्त्रसाठा जप्त

**इम्फाल, दि. १५ :** मणिपूर पोलिस, केंद्रीय सशस्त्र पोलिस दल (सीएपीएफ), लष्कर आणि आसाम रायफल्सच्या संयुक्त पथकांनी मणिपूरच्या इंम्फाल खोऱ्यातील ५ जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्रे आणि दारूगोळा जप्त केला आहे. यामध्ये ३२८ स्वयंचलीत बंदुकांसह मोठ्या प्रमाणात हँडग्रेनेड आणि दारूगोळ्याचा समावेश असल्याची माहिती माहिती अतिरिक्त पोलीस महानिरीक्षणक लहरी दोरजी लहटू यांनी पत्रकार परिषदेत दिली.सुरक्षा दलांनी १३ व १४ जूनच्या मध्यरात्री इंफाळ पूर्व, इंफाळ पश्चिम, बिष्णुपूर, काकचिंग आणि थौबल जिल्ह्यांत ही धडक कारवाई करत स्फोटके आणि इतर शस्त्रसामग्री जप्त केली. यामध्ये १५१ एसएलआर रायफल्स, ६५ इन्सास रायफल्स, इतर प्रकारच्या %३ रायफल्स, ५ कार्बाइन गन, २ एमपी–५ गन अशा एकूण ३२८ स्वयंचलीत बंदुकी आणि दारुगोळा जप्त करण्यात आला. गोपनीय माहितीच्या आधारे मणिपूर पोलीस आणि सुरक्षा दलांनी सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी आणि नागरिकांची आणि त्यांच्या मालमत्तेची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी ही कारवाई केली आहे, असेही लहटू यांनी स्पष्ट केले.

---

### डीएनएद्वारे शोधला माजी मुख्यमंत्री रुपाणींचा मृतदेह

**अहमदाबाद, दि. १५ :** एअर इंडियाच्या अहमदाबाद – लंडन मार्गावरील ख १७१ विमानाला झालेल्या अपघातात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांचा मृत्यू झाला. विमानात असलेल्या २४२ जणांपैकी २४१ जणांचा मृत्यू झाला. विमान ज्या ठिकाणी कोसळले तिथे असलेल्या ३३ नागरिकांचाही मृत्यू झाला. यामुळे विमान अपघातातील मृतांची एकूण संख्या २७४ झाली आहे. अनेक मृतदेह अपघातात अर्धवट जळून गेले आहेत. यामुळे मृतदेहांची ओळख पटविण्यासाठी डीएनए चाचणी सुरू आहे. माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांच्या मृतदेहाची ओळख पटविण्याचे काम डीएनए चाचणीद्वारे पूर्ण करण्यात आले आहे. लवकरच विजय रुपाणींचा मृतदेह शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यासाठी नातलगांना सुपूर्द केला जाणार असल्याचे वृत्त आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार ८६ पेक्षा जास्त मृतदेहांची ओळख डीएनए चाचण्यांद्वारे करण्यात आली आहे. याआधी गुजरातचे गृहमंत्री हर्ष संघवी यांनी माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांच्या मृतदेहाची ओळख पटविण्याचे काम डीएनए चाचणीद्वारे पूर्ण केल्याचे जाहीर केले.

## 'सर आली धावून.. रस्ते गेले वाहून..'

▶ पणजीतील रस्त्यांच्या निकृष्ट दर्जामुळे संताप

टीम दैनिक हेराल्ड



**पणजी, दि. १५ :** अवघ्या काही दिवसांच्या पावसाने 'स्मार्ट' सिटीतील स्मार्ट रस्त्यांनी जीव सोडला आहे. अनेक रस्त्यांत खड्डे पडायला सुरुवात झाली असून निकृष्ट दर्जाच्या या कामावर राजधानी पणजीतील नागरिक संतप्त झाले आहेत.

ताज विवांता हॉटेलसमोरील चौकातून अल्तिन्होकडे जाणारा रस्ता, अवघ्या एका–दोन महिन्यांपूर्वीच तयार झाला असतानाही, पहिल्याच पावसात खड्ड्यांनी भरून गेला आहे. डांबरी रस्त्याच्या पृष्ठभागाचा झपाट्याने खचलेला दर्जा, स्मार्ट सिटीच्या दाव्यांना खुले आव्हान देतो.

पणजीतील स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत विकसित होणारे रस्ते हे शाश्वत, सुरक्षित आणि टिकाऊ असतील, असा दावा करण्यात आला होता. प्रकल्पाच्या प्रस्तावात स्पष्टपणे नमूद होते की, रस्त्यांच्या बांधकामासाठी मजबूत सामग्री वापरली जाईल, योग्य ड्रेनेज यंत्रणा उभी राहील आणि वाहतूक तसेच पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी स्मार्ट तंत्रज्ञानाचा वापर होईल. मात्र, वस्तुस्थिती पूर्णपणे वेगळी चित्र मांडते.

या भागात रेस्टॉरंट चालवणारे रत्नाकर शेट्टी यांनी परिस्थितीवर उपहासपूर्ण हसत प्रतिक्रिया दिली. स्मार्ट सिटी स्मार्ट वाटत नाही. कामाचा दर्जा खूपच खराब आहे. पहिल्या पावसातच रस्ता उध्वस्त होतो, हे म्हणजे कामाची शोकांतिका, असे ते म्हणाले. त्यांनी या प्रकल्पावर खर्च झालेल्या निधीचा हिशोब मागितला. स्थानिक रहिवासी स्टीफन फर्नांडिस यांनी थेट आरोप केला की, सार्वजनिक निधीचा अपव्यय होतो आहे. स्मार्ट सिटी अंतर्गत कामांची अंतिम मुदत ३० जून आहे, पण या वेगाने जर रस्ते उद्धवस्त होत असतील, तर तो निधी नेमका कशासाठी वापरला जातोय? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. कोणतीही जबाबदारी घेतली जात नाही, अशी त्यांची खंतही होती.

पान २ ▶

## इंद्रायणी नदीवरील पूल कोसळला ; ४ ठार, ३२ जखमी, ६ गंभीर

पुणे, दि. १५ :



पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यात रविवारी सुट्टीच्या दिवशी मोठी दुर्घटना घडली. कुंडमळा येथील इंद्रायणी नदीवरील जुना लोखंडी पूल कोसळल्यामुळे त्यावर उपस्थित असलेल्या पर्यटकांपैकी अनेकजण नदीच्या प्रवाहात पडले. आतापर्यंत चार मृत्यूंची आणि ३२ जखमींची नोंद झाली असून, त्यापैकी सहा जणांची प्रकृती गंभीर आहे, अशी माहिती महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या सोशल मीडिया पोस्टद्वारे दिली आहे.

रविवारी सुट्टी आणि वीकेंडचा योग आल्यामुळे पावसाळ्यात प्रसन्न वातावरण अनुभवण्यासाठी कुंडमळा परिसरातील इंद्रायणी नदीच्या तीरावर पर्यटकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. पुलावर सुमारे ५० हून अधिक लोक उपस्थित होते, असा स्थानिकांचा अंदाज आहे.

दुर्घटना घडल्यानंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतकार्य सुरू केले. त्यानंतर राष्ट्रीय आपत्ती निवारण पथक (एनडीआरएफ) आणि अग्निशमन दल दाखल झाले. एनडीआरएफने दिलेल्या माहितीनुसार, आतापर्यंत ३८ जणांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात यश आले असून, बचावकार्य अद्याप सुरू आहे.

या दुर्घटनेमागे पुलाची खराब अवस्था कारणीभूत असल्याचा आरोप अनेक स्थानिक नेते व नागरिकांनी केला आहे. या पुलाच्या दुरवस्थेबाबत आम्ही वारंवार प्रशासनाला सूचना दिल्या होत्या, पण योग्यवेळी दुरुस्ती न झाल्यामुळे हा अपघात झाला, अशी संतप्त प्रतिक्रिया स्थानिकांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केली. विशेष म्हणजे, या पुलावरून दुचाकी वाहने नेण्यास बंदी असल्याचा फलक लावण्यात आला होता. मात्र, काही पर्यटक नियम झुगारून दुचाकी घेऊन पुलावरून जात असल्याचे काही स्थानिकांनी सांगितले.

दुर्घटनेबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही प्रतिक्रिया दिली. पुलाची अवस्था जीर्ण असल्याची प्राथमिक माहिती प्रशासनाकडून मिळाली आहे.

पान २ ▶

## केदारनाथ हेलिकॉप्टर दुर्घटना : पायलटसह सात जणांचा मृत्यू

### हेलिकॉप्टर सुरक्षेवर चिंतेचे वातावरण | सहा आठवड्यात पाच हेलिकॉप्टर अपघात

देहराडून, दि. १५ :

रविवारी (१५ जून) पहाटे उत्तराखंडमधील रुद्रप्रयाग जिल्ह्यातील गौरीकुंड वनक्षेत्रात आर्यन एव्हिएशन कंपनीच्या हेलिकॉप्टरचा भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत पायलटसह सात जणांचा जागीच मृत्यू झाला असून, मृतांमध्ये एका १० वर्षीय बालकाचाही समावेश आहे.

हे हेलिकॉप्टर केदारनाथ धाम येथून गुप्तकाशीकडे प्रवाशांना घेऊन जात असताना सकाळी ५.१७ वाजता उड्डाण केले होते. मात्र खोऱ्यात अचानक बदललेल्या प्रतिकूल हवामानामुळे आणि दृश्यमानता कमी झाल्यामुळे हेलिकॉप्टर दिशा भरकटले आणि जंगलात कोसळले, अशी प्राथमिक माहिती अधिकाऱ्यांनी दिली. पायलट राजवीर यांच्या व्यतिरिक्त विक्रम रावत, विनोद, तृष्टी सिंह, राजकुमार, श्रद्धा आणि १० वर्षीय रश यांचा या अपघातात मृत्यू झाला.

दुर्घटनास्थळ हे दाट जंगलात आणि अत्यंत दुर्गम असल्याने राज्य आपत्ती प्रतिसाद दल , राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल आणि स्थानिक पोलिसांनी तातडीने संयुक्त शोध व बचाव मोहीम राबवली. कमांडंट अर्पण यदुवंशी यांच्या नेतृत्वाखाली पथके घटनास्थळी पोहोचली.

उत्तराखंडमधील गेल्या सहा आठवड्यांतला हा पाचवा हेलिकॉप्टर अपघात असून, चारधाम यात्रा काळातील हेलिकॉप्टर सेवेच्या सुरक्षेवर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.

या घटनेनंतर मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी दुःख व्यक्त करत तातडीने एक उच्चस्तरीय आपत्कालीन बैठक बोलावली. रविवारी सकाळी खराब हवामानामुळे एक हेलिकॉप्टर कोसळले. मृतांप्रती मी शोक व्यक्त करतो. डीजीसीए च्या नियमांचे पालन होईल, याची काळजी घेतली जाईल, असे त्यांनी म्हटले.

मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली देहराडून येथे झालेल्या बैठकीत मुख्य सचिव, नागरी विमान वाहतूक सचिव, पर्यटन विभाग, आपत्ती व्यवस्थापन



अधिकारी, उत्तराखंड नागरी विमान वाहतूक विकास प्राधिकरण आणि माहिती संचालनालयाचे अधिकारी उपस्थित होते. व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे अनेक विभागीय अधिकारी देखील सहभागी झाले. मुख्यमंत्र्यांनी या घटनेच्या पार्श्वभूमीवर हेलिकॉप्टर सेवा अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि नियमबद्ध करण्यासाठी तांत्रिक समिती स्थापन करण्याचे आदेश दिले. ही समिती नव्या मानक कार्यपद्धती तयार करेल. तसेच, या अपघातासह मागील सर्व अपघातांची चौकशी करणारी उच्चस्तरीय समिती देखील तयार करण्यात आली आहे. ही समिती सर्व बाबींचा तपास करून त्रुटींची नोंद करेल आणि दोषींवर कठोर कारवाईची शिफारस करेल. दरम्यान, ट्रान्सभारत एव्हिएशनच्या दोन हेलिकॉप्टरने प्रतिकूल हवामानात उड्डाण केल्याचे निदर्शनास आल्यानंतर संबंधित वैमानिकांचे परवाने सहा महिन्यांसाठी निलंबित करण्यात आले आहेत, अशी माहिती विमान वाहतूक महासंचालनालयाने (डिजीसीए) दिली आहे. हेलिकॉप्टर अपघातानंतर सुरक्षेच्या कारणास्तव चारधाम यात्रेतील हेलिकॉप्टर सेवा दोन दिवसांसाठी स्थगित करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री धामी यांनी सांगितले की, उत्तराखंडसारख्या दुर्गम पर्वतीय प्रदेशात हेली सेवा आपत्कालीन प्रतिसाद, तीर्थयात्रा आणि दैनंदिन वाहतुकीसाठी अत्यावश्यक आहेत. त्यामुळे त्यातील सुरक्षितता हीच आमची सर्वोच्च प्राथमिकता असेल. उत्तराखंडमधील वारंवार होणाऱ्या हेलिकॉप्टर अपघातांनी पुन्हा एकदा उच्च हिमालयीन भागांतील विमान सेवांच्या सुरक्षिततेवर गंभीर चिंता व्यक्त केली आहे. तांत्रिक पातळीवर सुधारणा आणि ऑपरेटर कंपन्यांचे कठोर प्रमाणन हे या संकटावर उत्तर असू शकते